# दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला.

{मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक}

**प्रशासकीय कार्यालयः** "जनकल्याण", 58/59, तोष्णीवाल ले-आऊट, दुध डेअरीजवळ, मुर्तिजापुर रोड, अकोला-444001[महा.]

शाखा – मूर्तीजपुर**,** मेन रोड. मूर्तीजपुर

॥ सहकारेण जनकल्याणम् ॥

## स्थावर मालमत्तेची जाहीर निविदेव्दारे विक्रीचे अटी व नियम

थकीत कर्जदार **बाहेती ट्रेडिंग कंपनी प्रो.पा.सौ आशा महेशकुमार बाहेती रा. स्टेशन विभाग मुर्तीजापुर ता. मुर्तीजापूर जि. अकोला** (कर्जदार फर्म) तर्फे प्रोप्रायटर सौ आशा महेशकुमार बाहेती रा. स्टेशन विभाग मुर्तीजापुर ता.मूर्तीजापूर जि. अकोला मुर्तीजापूर शाखा, मुर्तीजापूर यांचे कर्जास **(१) महेश रामजीवन बाहेती (क्रमांक २ ते ६ चे मुखत्यारपत्र धारक) २)जमनाबाई रामजीवन बाहेती ३) दिनेश रामजीवन बाहेती ४)सुनीलकुमार रामजीवन बाहेती ५)नवल रामजीवन बाहेती ६) शोभा संजय भट्टड** यांचे मालकीच्या व बँकेकडे गहाण दिलेल्या व बँकेच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेली मालमत्ता जाहीर निविदेव्दारे (दुसरी वेळ) विक्रीसाठीचा तपशील पुढील प्रमाणे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन :-

| अनु.क्र. | स्थावर मालमत्ता | राखीव किंमत रु. |
|---|---|---|
| | मौजे सिरसो-२ ता. मुर्तीजापूर जि.अकोला ग्राम पंच्यायत हद्दीतील शेत सर्वे नं.२५३/२ वि. एस.डी.ओ. मुर्तीजापूर यांचे दि.१४.०१.२०२१च्या रेवेन्यु केस न.एन.एन.पी./**34/Sirso-2/08/2020-2021** नुसार अकृषक करण्यात आलेला ले-आऊट मधील प्लॉट क्र.३८ ज्याचे एकुण क्षेत्रफळ २६३.२३ स्के.मी.( २८३३.४० स्के.फुट) जागा व त्यावरील बांधकाम<br>पुर्वेस - प्लॉट न.३७<br>पश्चिमेस - फील्ड सर्वे न.२५३ मधील शेत जमीन<br>उत्तरेस - प्लॉट न. ४४ **(** Public amenity**)**<br>दक्षिणेस - ९ मीटर रोड | २४,९४०००/- |

**टेंडर प्रक्रियेसबंधीची माहीती**

| **जागा/स्थावर तपासणी** | | **टेंडर फॉर्म मुर्तीजापूर शाखा मुर्तीजापूर** | | **मुर्तीजापूर शाखा मुर्तीजापूर येथे टेंडर फॉर्म जमा करावयाची शेवटची दिनांक व वेळ** | | **टेंडर उघडण्याची तारीख,वेळ व जागा** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | वेळ | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ | टेंडर उघडण्याचे स्थळ |
| २१.०५.२०२६ | सकाळी १२.०० ते दुपारी ४.०० पर्यन्त | २१.०५.२०२६ ते ०८.०६.२०२६ | सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० पर्यन्त | ०८.०६.२०२६ | दुपारी ४.३० पर्यन्त | ०९.०६.२०२६ | सकाळी ११.३० वाजता | दि अकोला अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि. अकोला,मुख्य-कार्यालय "जनकल्याण" 58/59 तोष्णीवाल ले-आऊट, दुध डेअरी च्या मागे मुर्तीजापूर रोड,अकोला. |

**वरील स्थावर मालमत्तेच्या काढण्यात आलेल्या जाहीर निविदेव्दारे विक्रीसाठीचे अटी व नियम (दुसरी वेळ)**:-

1) इच्छुक खरेदीकर्ता हे जाहिरातीमधील नमुद असलेल्या स्थावर मालमत्तेसाठी आपले प्रस्ताव सादर करू शकतात. त्याकरिता स्थावर मालमत्तेची राखीव किंमत निश्चित करण्यात आली आहे. इच्छुक खरेदीदार त्यानुसार आपले प्रस्ताव सादर करू शकतात.
2) विक्रीसाठीचे सुचनेतील तपशिला मधील मालमत्ता **("AS IS WHERE IS BASIS", "AS IS WHAT IS BASIS" and "WHATEVER THERE IS" )** या तत्वावर विक्री करण्यात येईल.
3) स्थावर विक्रीचे टेंडर फॉर्म, आमचे दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला, मुर्तीजापूर शाखा, मुर्तीजापूर येथे नमुद केल्याप्रमाणे सकाळी ११.०० वा. पासून दुपारी ४.०० वा. पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी रु. ५००/-+ जी.एस.टी. (अक्षरी रु. पाचशे फक्त +जी.एस.टी.) चा रोख भरणा करून (परत न मिळणारी रक्कम) अधिकृत अधिकाऱ्याकडून प्राप्त करता येईल.
4) इच्छुक प्रस्तावकांनी आपले प्रस्ताव दोन लिफाफ्यात सादर करावे एका लिफाफ्यात प्रस्तावित रक्कमेच्या १०% अनामत, व्याज देय नसलेल्या रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर **"दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला ई. एम.डी. खाते "बाहेती ट्रेडिंग कंपनी"** या नावाने अकोला येथे देय असलेला व तसेच दुसऱ्या लिफाफ्यात निविदा पुर्णपणे भरून लिफाफ्यावर **" स्थावर खरेदीचा प्रस्ताव "** असे नमुद करून दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.**,** अकोला**,** मुर्तीजापूर शाखा मुर्तीजापूर येथे वर नमुद केलेल्या मुदतीत दोन्ही लिफाफे सादर करावेत.
5) विना अनामत रक्कमेच्या किंवा प्रस्ताव रक्कमेच्या प्रमाणात ड्राफ्ट/पे ऑर्डर नसलेल्या प्रस्तावावर व राखीव किमती पेक्षा कमी किमतीचे प्रस्तावावर विचार करण्यात येणार नाही. तसेच कोणताही सशर्त प्रस्ताव (**Conditional Offer**) स्विकारण्यात येणार नाही.
6) प्राप्त झालेले प्रस्ताव **दि.०९.०६.२०२६** रोजी सकाळी ११.३० वाजता दि अकोला अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक ली.,अकोला चे प्रशासकीय कार्यालय तोष्णीवाल ले आऊट मुर्तीजापूर रोड अकोला येथे उघडण्यात येईल. त्यावेळी सभागृहात प्रस्तावक उपस्थीत राहु शकतात व इच्छुक प्रस्तावक प्रस्ताव रक्कमेत वाढ सुद्धा करू शकतात.
7) ज्या प्रस्तावाला मंजूरी देण्यात येईल त्या प्रस्तावकर्त्यास २५% रक्कम (अनामत रक्कमेसह) त्याच दिवशी **दि. ०९.०६.२०२६** रोजी दुपारी ४.३० वाजेपर्यंत बँकेत जमा करावी लागेल. प्रस्तावाची उर्वरीत ७५% रक्कम + स्टॅम्प ड्यूटी ची रक्कम ही १५ दिवसात अथवा खरेदीकर्ता व अधिकृत अधिकारी यांचे आपसी समझोत्याने लेखी मंजूर केलेल्या मुदतीत जास्तीत जास्त ६० दिवसात जमा करावी लागेल. दिलेल्या मुदतीत पुर्ण रक्कम न आल्यास जमा असलेली संपुर्ण रक्कम जप्त (फॉरफिट) होवून नविन प्रस्ताव मागविण्याचा अधिकार बँकेला राहील. मंजुर झालेल्या निविदेची माहिती त्वरित गहाणदारस देण्यात येऊन, त्यांना प्राप्त प्रस्तावा पेक्षा जास्त रक्कम जमा करण्याची एक संधि देण्यात येईल. यासाठीच प्रस्तावास उपरोक्त ७५% रक्कम जमा करण्याचा अवधि दिला जाईल.

8) या मालमत्तेच्या हक्काविषयी किंवा त्रयस्थ पक्षाने सांगितलेल्या अधिकाराबाबत किंवा संबंधिताच्या विधिग्राहयतेबाबत अन्य भार/दावे/अधिकार/थकबाकी इत्यादी बाबतीत बँकेची कोणतीही दायित्वे आणि जवाबदारी राहणार नाही.

9) स्थानिक/शासकीय/निमशासकीय प्रलंबीत व चालु कर,प्रलंबीत व चालु चार्जेस,वीजबिल,पानिपट्टी,सोसायटी चे मेंटेनन्स. ग्रामपंचायत, स्थानिक व राज्य/केंद्र शासनाने निर्धारीत केलेल्या हस्तांतरण व ईतर संबंधीत सर्व प्रकारच्या आवश्यक सर्व प्रकारच्या आवश्यक मंजुराती/प्रमाणपत्रे आणि इतर सर्व खर्च ज्यांचा प्रस्ताव मंजुर होईल त्या प्रस्तावक/खरेदीदार यांना स्वत:करावा लागेल.

10) खरेदीदाराने त्याच्या/त्यांच्या समाधानासाठी मालमत्तेशी संबंधीत सर्व बाबींची योग्य ती शहानिशा व खात्री करून घेतली पाहीजे. खरेदीदारास या संदर्भात अधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको यांच्या विरुद्ध या तारखेनंतर कोणताही दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

11) प्रस्ताव स्वीकृतीनंतर तसेच विक्री किमतीचा संपूर्ण भरणा प्राप्त झाल्यानंतर बँकेचे अधिकृत अधिकारी उपलब्ध नियमात दिलेल्या "Appendix V" च्या प्रारूपानुसार विक्री प्रमाणपत्र करून देतील.

12) ज्या नावाने निविदा / प्रस्ताव सादर करण्यात येईल त्याच प्रस्तावकाच्या नावाने (विक्री पत्र) सेल सर्टीफिकेट जारी करण्यात येईल.

13) सर्वात जास्त किंमतीचा प्रस्ताव किंवा कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्विकृत करण्याचे बंधन अधिकाऱ्यांवर राहणार नाही व कोणतेही कारण न देता ते प्रस्ताव नामंजुर करण्याचा अधिकार अधिकृत अधिकाऱ्यास राहील.

14) सेल सर्टिफिकेट नोंदविणे पुर्वी व नंतर कायद्यानुसार लागणारी स्टॅम्प ड्युटी, रजि.शुल्क, आकार, ट्रान्सफर चार्जेस, इ. खर्च खरेदीदारास करावे लागतील.

15) विक्री प्रक्रीयेच्या इतर अटी व शर्ती करीता अधिकृत अधिकारी दि अकोला अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक ली. अकोला शाखा मुर्तीजापूर शाखा मुर्तीजापूर यांचेशी संपर्क साधावा.

16) ज्यांचा प्रस्ताव मंजुर होणार नाही किंवा खरेदी प्रक्रीया रद्द झाल्यास जमा केलेली अनामत रक्कम पे-ऑर्डर/डिमांड ड्राफ्ट स्वरुपात निविदा उघडल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांत बँकेचे व्यवहार सुरू असल्याचे दिवशी परत करण्यात येईल व या रक्कमेवर व्याज मिळणार नाही.

17) सदर जाहीर निविदेव्दारे विक्रीची प्रक्रिया ही सरफेसी कायदा/नियम नुसार करण्यात येईल.

18) वरील जाहीरात ही आमचे बँकेच्या वेब साइट "www.akolaurban.bank.in" वर उपलब्ध राहील/आहे.

19) प्रस्तावा बाबत किंवा विक्री पत्राबाबत काही किंवा इतर अडचणी बाबत तक्रार असेल तर ती अधिकृत अधिकारी / बँकेच्या लवादा समोर येऊन सोडवावी लागेल.

ठिकाण : मुर्तीजापूर
दिनांक : ०६.०५.२०२६

अधिकृत अधिकारी,
दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.**,** अकोला**,**
मुर्तीजापूर -शाखा मुर्तीजापूर